MHMM190044772021

महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
६६ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई

नोटीस क्र :—४७०/एन्/२०२१ गुन्हा नोंद क्र :— ४९०/२०२१.
पोलीस ठाणे साकीनाका

मुरूगलवेल रामलिंगम ... अर्जदार.

विरूध्द्

महाराष्ट्र सरकार, ... गैरअर्जदार.
द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
(साकीनाका पोलीस ठाणे)

निशाणी क्र.—१ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज साकीनाका पोलीस ठाणे गुन्हा क्र. ४९०/२०२१ कलम ३८० भा.द.वि. संहितामध्ये जप्त रिअल मी कंपनीचे सफेद रंग आणि निळा रंग असलेल्या दोन मोबाईल फोन चा अंतरिम ताबा मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. जप्त मुद्देमालापैकी सफेद रंगाचा मोबाईल फोन हा अर्जदाराच्या मालकीचा असून निळया रंगाचा मोबाईल फोन हा त्याची पत्नी अनुप्रिया हिचा असल्याचे त्याचे म्हणणे आहे. अर्जदाराकडे जप्त मुद्देमालाच्या पावत्या नाहीत. अशी कथने करून अर्ज मंजूर होण्याची विनंती अर्जदाराने केलेली आहे. अन्वेषन अधिकारी व शासकीय अभियोक्ता यांचे म्हणणे वाचले. अर्ज मंजूर होण्यास त्यांचा आक्षेप नाही. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्जाच्या पृष्ठर्थ अर्जदाराने स्वत:चे शपथेवर प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र.२), त्याची पत्नी अनुप्रिया हिचे शपथेवर प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र.३) दाखल केलेली आहे. तपासी अंमलदार आणि सरकारी वकीलांनी मुददेमाल अर्जदारास परत करण्यासाठी हरकत घेतली नाही. तसेच अर्जदाराच्या पत्नीने देखील तीचा जप्त मोबाईलचा ताबा अर्जदाराकडे देण्यास तिची हरकत नसल्याचे सांगितलेले आहे. अर्जदार जप्त मोबाईलचा कायदेशीर ताबेदार सकृतदर्शनी दिसून येत आहे. आजपर्यंत इतर कोणीही जप्त मुददेमालाबाबत कोणत्याही प्रकारे दावा केलेला नाही. जप्त मुद्देमाल अर्जदारास परत देण्यास कोणतीही

अडचण दिसत नाही. त्यामुळे अर्ज अटी व शर्तीवर मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ संबंधित तपासी अंमलदार यांना आदेशीत करण्यात येते की, साकीनाका पोलीस ठाणे गुन्हा क्र. ४९०/२०२१ कलम ३८० भा.द.वि. संहितामध्ये जप्त रिअल मी कंपनीचे सफेद रंग आणि निळा रंग असलेल्या दोन मोबाईल फोन चा अंतरिम ताबा अर्जदारास त्याने रू. २०,०००/. (रू. वीस हजार फक्त) चा क्षतीपूर्ती बंधपत्र दिल्यावर खालील अटींवर त्यास देण्यात यावा.

अ अर्जदाराने जप्त मुदद्‌माल न्यायालयाच्या पूर्व परवानंगी शिवाय हस्तांतरित करू नये अथवा त्यामध्ये बदल करू नये.

ब तपासी अंमलदार यांनी जप्त मुदद्‌मालाचे छायाचित्रे सर्व बाजूंनी भविष्यातील त्याच्या ओळखीसाठी काढावेत व त्याबाबतचा दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा तयार करावा.

३ छायाचित्रे, पंचनामा व क्षतीपूर्ती बंधपत्र अन्वेषन अधिका—याने दोषारोपपत्रासोबत अथवा अंतिम अहवालासोबत दाखल करावेत.

स्वाक्षरी/—

दि.२३/०६/२०२१.

(भागवत तु. झिरपे)
महानगर दंडाधिकारी,
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.